१९७६)  ईवलेसे रोप लावियले द्वारी । तयाचा वेलू गेला गगनावरी।  (२००४



# ज्योती



http://www.neomm.org

ईशान्य ओहायो मराठी मंडळ          वर्षारंभ विशेषांक–२००४          NEOMM Tax ID: 34-1644989

## कार्यकारिणी २००४

अध्यक्ष – ज्योती हरवाळकर
उपाध्यक्ष – श्रीकांत लिमये
सचिव – छाया मालुर
खजिनदार – अच्युत मालुर
स्वयंसेवक – विजय हरवाळकर

संपादिका 'ज्योती'– अंजू जोशी
स्वयंसेवक– अश्विनी दर्यापूरकर
अंकरचना सहाय्य – मुकुल जोशी
मुद्रक/ वितरक – अजित  जोशी

सांस्कृतिक कार्यवाह –
गीता लिमये, संध्या अशोक देशपांडे
स्वयंसेवक –
अंजली चितळे, अनिता अमीन, प्रतिभा फडके, पराग कानविंदे

विश्वस्त –
बापू गोखले, रजनी दिवाण, रजनी शेंदुरे, सुनील दुभाषी

Webmasters –
शीतल गडकरी, प्रभा सातोस्कर

सभासद –
विजया, नितीन कुळकर्णी

## संपादकीय

नमस्कार मित्रमैत्रीणींनो! संपादीका म्हणून आज वर्षाने भेट होत आहे! माझ्या आवडीचे हे काम परत करायला मिळाले यात मी माझा गौरव  समजते.

भारतातील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जगातील महासत्तेच्या प्रांगणात  चूल बोळकी मांडून संसार थाटलेले आम्ही मरहट्टे. आम्हाला आहे पुढ्च्याची आस व मागची ओढ! विकासाच्या वाटा खुणावतात तशाच मायमाउलीकडून आलेल्या पाउलवाटा अंतर्मुख करतात. संगणकीय, वैद्यकीय आणि वैज्ञानिक क्षेत्रात भरारी मारणारे मराठी मन मायमराठीला विसरुच शकत नाही. मला वाटते मराठी मंडळ व ज्योती हे आपले द्वैमासिक मराठी विषयीची भूक काही अंशी तरी भागवत असेल.

आज २५ वर्षे झाली ही ज्योती तेवत ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. सुरवातीला मंडळी संपूर्ण ज्योती हस्तलिखीत स्वरूपात काढत असत. त्यासाठी खरोखरच मेहनत पडत असे. परंतु आता संगणकाच्या मदतीने काम खूपच सोपे झाले आहे. वेळ मात्र द्यावा लागतो.

२००४ च्या वर्षातील हा पहिला अंक सभासदांच्या हाती देताना खूप आनंद होत आहे. मराठी मंडळाचे मुखपत्र ही एकच भूमिका 'ज्योती' ची नाही, हे द्वैमासिक चालू ठेवण्यासाठी आपल्या सर्वांच्या सहका~याची,साहित्यिक योगदानाची अपेक्षा आहे.आपण साहित्य पाठवले तरच हा अंक सजणार आहे नटणार आहे.आणि आपल्याकडे गुणी साहित्यिक कलाकार भरपूर आहेत हे उघड गुपित आहे.

तेव्हा मंडळी हात सरसावून तयार रहा.
हे नवीन वर्ष सर्वांना सुखसमृद्धीचे जाओ.

आपली,
अंजू

## मराठी मंडळाचे आगामी कार्यक्रम **

संक्रांत – शनिवार, २४ जानेवारी
होळी – शनिवार, ६ मार्च
महाराष्ट्र दिन – शनिवार, १ मे
सहल – शनिवार, २४ जुलै
गणेशोत्सव –शनिवार, २५ सप्टेंबर
दिवाळी – शनिवार, २० नोव्हेंबर

**(programs are subject to change based on prevailing conditions; new events may be added to future editions of 'Jyoti')

## 'ज्योती' साठी साहित्य

आपले लेख, कथा, कविता, विनोद, इत्यादि दर सममहिन्याच्या (February, April, June, etc.) १५ तारखेपर्यंत e-mail ने पाठवावे. [**ajitanju@myprimus.com**]

## Advertisements

Please contact any officer of the Marathi Mandal to post your advertisement in upcoming editions.

Rates:
Quarter page = $25
Half page = $50
Full page = $75
**All rates for Diwali issue are doubled!**

'ज्योती'' मध्ये प्रकाशित झालेल्या साहित्याशी संपादक मंडळ अथवा ईशान्य ओहाओ मराठी मंडळ सहमत असेलच असे नाही.

## अध्यक्षांचे बोल...

ॐ श्री गणेशाय नमः

नमस्कार मंडळी,

बघता बघता नवीन वर्ष सुरु पण झाले. नवीन अध्यक्षा निवडून आली आणि नवीन कार्यकारिणी जमली. आत्ता कुठे उपाध्यक्षा होते आणि इतक्या लवकर अध्यक्ष पदाची जबाबदारी आली की!

मागच्या वर्षी चेतनने उपाध्यक्ष पदाची ऑफर केली होती तेव्हां मला उत्तर द्यायला एक आठवडा लागला. ह्या वर्षी अध्यक्ष पदाकरिता हो–नाही करत शेवटी हो म्हणाले! माझा होकार ऐकताच आई–बाबा जमीनी वरून दोन फूट वरच उडाले! "तुला तर मराठी धड बोलता, लिहिता, वाचता येत नाही आणि चालली अध्यक्ष बनायला; ... ठिकाणावर आहे न?" त्यांची कल्पना अशी की मंडळाच अध्यक्ष पद म्हणजे काळयापाण्याची शिक्षाच! एखाद्याला खुर्ची वर बसवलं की मग वर्षभराची निश्चिंति!– अध्यक्ष वगळून!

हाच अनुभव आमच्या ज्येष्ठ बंधूंना पण आला होता बरं का. पण आपण कधी आई–बाबांच ऐकतो का? मुळीच नाही. पण त्यांची काळजी विजयच्या बाबतीत जशी काल्पनिक ठरली अगदी तशीच माझ्या बाबतीत पण ठरो. गंमत अशी की, ह्या वर्षी कार्यकारिणीत काम करायला इतके हौशी, उत्साही मंडळी कंबर कसून, "पदर खोचून!!!" तयार आहेत हे पाहूनच आई–बाबांचं, आणि माझं मन आनंदाने नाचू लागल आहे आणि माझ्या अर्ध्या काळज्या पळून गेल्या आहेत. आता, आमच्या उरलेल्या काळज्या केंव्हा दूर होतील? जेंव्हा आपण सर्व मंडळी इतक्याच उत्साहाने, आपलेपणाने सगळ्या कार्यक्रमांना उपस्थित राहाल, भाग घ्याल, आम्हाला प्रोत्साहन द्याल तेव्हां; काही चुका झाल्या तर क्षमा कराल, आणि ह्या तरूण मंडळाच मार्गदर्शन कराल तेव्हां.

सर्व कार्यकरिणी तर्फे आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा आणि हे वर्ष आपणा सर्वांना सुख–समृद्धीचे जावो ही प्रार्थना. वर्षभर आमची–तुमची भेट होत राहीलच.

इराण मध्ये झालेल्या भयंकर भूकंपात हजारोनी मरण पावलेल्यांच्या आत्म्यांना श्रद्धांजली अर्पण करूया.

मराठी नीट येत नसतांना इतकं बोलले, आलं असतं तर......?

कळावे, लोभ असावा ही विनंती.

– ज्योती हरवाळकर


**Our Quality Meets Your Taste and Needs**

# Asian Imports, Inc.

Groceries & Food From India

**Phone (440) 777-8101**

26885 Brookpark Extn.
N. Olmsted, OH 44070
**Fax (440) 777-8012**

Tue – Sat: 11:00 – 7:00
Sun: 11:00 – 5:00
Monday: Closed

# Beauty Service

Facial
Waxing
Bleeching
Pedicure, Manicure
Eyebrow, Upper Lips & entire Face - (Threading)
Heena for Hair
Bridal Mehandi and other occasion
Bridal Makeup and other occasion makeup
Hair cutting, hair style and hair high lighting

***Contact:***

**BHAVNA SHAH**
**11950 HARBOUR LIGHT DR.**
**NORTH ROYALTON, OH 44133**
**PH: (440) 877 1189**


## चार महिने तालमींचे

– ज्योतीच्या वार्ताहराकडून
(मिलिंद कंटक)

"गेल्या दोन वर्षीप्रमाणे या वर्षीही कोजागिरीच्या सुमारास एक मराठी नाटक बसवायचा विचार आहे. तेव्हा इच्छुक व्यक्तींनी माझ्याकडे संपर्क साधावा." आपल्या सर्वांच्या परिचयाचे पराग कानविंदे यांनी मंडळाच्या एका सहलीत घोषणा केली. "आतापर्यंत अनेक एक अंकी नाटकं झालीत, तेव्हा २००३ साली दोन अंकी

नाटकच यशस्वी झाले पाहिजे."  वार्ताहरांनी घेतलेल्या मुलाखतीत परागरावांनी आपले विचार मांडले.

"मराठी नाटक होणार!" ही बातमी फोफाटयाने जनसमुदायात पसरली.  जुलै १३ च्या दुपारी परागरावांच्या पाताळघरात (म्हणजे बेसमेंट हो!) भेटण्याचे पक्के झाले.  अर्थात वार्ताहरांना आमंत्रण होतेच.  जुलै १३ रोजी कानविंदे–निवासासमोर रस्त्यावर गाडयांचा व दारासमोर चपला–बुटांचा हा खच पडलेला वार्ताहरांना दिसला. वार्ताहरांच्या गाडीसाठी मात्र अग्निजलखांबासमोर (फायर हायड्रंट हो!) एक मानाचे स्थान राखून ठेवल्याचे आढळले.  आधीच्या नाटकांतले यशस्वी कलाकार, म्हणजे लिमये, सामंत, जोशी, हरवाळकर, गंगाखेडकर इ. आणि नाटकात प्रथमच काम करू इच्छिणारे उत्साही कलाकार, म्हणजे देशपांडे, पोतदार, दर्यापूरकर इ. हजर होते. करायचे होते दोन अंकी हलके–फुलके मराठी नाटक आणि पात्रे जमली होती २५!  दिग्दर्शकांना पेच पडला.  एवढया लोकांना घेऊन लोकनाटय छान जमले असते असाही एक विचार त्यांच्या मनाला चाटून गेला.

"रामायण बसवले तर.....!" अजित जोशींनी योग्य वेळी सल्ला दिला.  आलेल्या सर्वांना रामायणात काम करण्याची संधी मिळावी हा अजितरावांचा विचार असावा.  विचार चांगला होता पण रामायणातली वानरे व्हायला कोणीच तयार होईना.

"किती वानरे हवीत?" कोणीतरी वानर–विक्री धंद्यात असल्याच्या थाटात विचारले.

"एकूण पात्रे २५, म्हणजे ३०–३५ वानरे तरी लागतील बघा." दिग्दर्शक.

"ठीक आहे, मग आयत्यावेळी प्रेक्षकांना बोलावून घेऊ स्टेजवर."

बेत पक्का करणार इतक्यात एवढया वानरांना मंडळाच्या खर्चात शेपटया कशा पुरवणार या शंकेमुळे रामायणाचा बेत रद्द करण्यात आला.

"महाभारत कसे वाटते मग?" पुन्हा जोशीबुवा म्हणाले. यावेळी कौरव होण्यास कोणी तयार होईना.  आणि नाटक पहायला किमान शंभर प्रेक्षक येतील अशी खात्री नसल्यामुळे तोही बेत कोलमडला.  शेवटी २५ पात्रांचा समावेश होईल असे, श्री. रत्नाकर मतकरींनी लिहिलेले "चार दिवस प्रेमाचे" हे प्रसिद्ध दोन अंकी नाटक निवडले गेले व तालमींना प्रारंभ झाला.

पुढचे एक–दोन आठवडे नाटकांच्या संवादांच्या प्रती वाटणे, पात्र नेमणूक, तालमींच्या जागा–वेळा, नाटकाची तारीख इ. ठरविण्यात गेले. लगेच तालमींना सुरुवात झाली.  कलाकारांनी स्वतःचे सोडून इतर पात्रांचे संवाद पाठ केल्याची नोंद वार्ताहरांनी केली आहे.  नाटक कोजागिरीच्या सुमारास सादर करण्याचे ठरवले. छाया मालूरांनी बरीच

(contd. on next page ...)

## Trust fund summary (by S.D. Gokhale, Trustee)

Marathi Mandal of Northeast Ohio

| | | Date | Maturity | Principle/Balance | Transaction | Intrst Rt | Interest | Total Int. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Starting Balance | 2/14/02 | 30 days | $25,189.12 | | 2.230% | | |
| | Transferred to 4 new CDs | 2/16/02 | | | ($20,000.00) | | | |
| | | 2/16/02 | 30days | $5,189.12 | | 2.820% | | |
| | | 12/31/02 | | $5,321.32 | | | $132.20 | |
| | | 2/16/03 | | $5,340.23 | | 1.982% | $18.91 | |
| | Transf to a new savg a/c | 2/22/03 | | | ($340.23) | | | |
| | Rold over in a CD | 2/22/03 | | $5,000.00 | | 3.800% | | |
| | #0259001358 | 6/30/03 | | $5,069.09 | | | $69.09 | |
| | Withdrew cash | 7/19/03 | | | ($69.09) | | | |
| | New CD | 2/22/03 | 60 months | $5,000.00 | | | | |
| | Balance | 9/30/03 | | $5,048.02 | | | $48.02 | $268.22 |
| 2 | New CD | 2/16/02 | 60 months | $5,000.00 | | 5.150% | | |
| | #0180011736 | 12/31/02 | | $5,295.19 | | | $295.19 | |
| | Balance | 9/30/03 | | $5,432.80 | | | $137.61 | $432.80 |
| 3 | New CD | 2/16/02 | 48 months | $5,000.00 | | 4.910% | | |
| | #0180011735 | 12/31/02 | | $5,217.96 | | | $217.96 | |
| | Balance | 9/30/03 | | $5,411.94 | | | $193.98 | $411.94 |
| 4 | New CD | 2/16/03 | 36 months | $5,000.00 | | 4.190% | | |
| | #0180011734 | 12/31/03 | | $5,185.57 | | | $185.57 | |
| | Balance | 9/30/03 | | $5,349.78 | | | $164.21 | $349.78 |
| 5 | New CD | 2/16/02 | 24 months | $5,000.00 | | 3.452% | | |
| | #0180011733 | 12/31/03 | | $5,152.53 | | | $152.53 | |
| | | 6/27/03 | | $5,241.11 | | | $88.58 | |
| | Withdrew cash | 7/19/03 | | $5,000.00 | ($241.11) | | | |
| | Balance | 9/30/03 | | $5,043.92 | | | $43.92 | $285.03 |
| 6 | New Saving A/C | #0180012702 | | $0.00 | | | | |
| | 2 New | 1/6/03 | | | $600.00 | 1.440% | | |
| | Life Members | | | | | | | |
| | | | | $600.00 | | | | |
| | Transferred from | 2/22/03 | | | $340.23 | | | |
| | CD (line 5) | | | $940.23 | | | | |
| | | 6/30/03 | | $944.88 | | | 4.65 | |
| | Withdrew Cash | 7/19/03 | | | ($600.00) | | | |
| | " | 7/19/03 | | | ($289.80) | | | |
| | | 7/19/03 | | $55.08 | | | | |
| | | 9/30/03 | | $55.69 | | | 0.61 | 5.26 |
| | 2 New Life Members | 12/16/03 | | | $650.00 | | | |
| | | | | $705.69 | | | | |
| 7 | Cash | | | | $69.09 | | | |
| | Transferred from | | | | $241.11 | | | |
| | 2 CDs and | | | | $600.00 | | | |
| | Saving A/C | | | | $289.80 | | | |
| | | | | | $1,200.00 | | | |
| | Transferred to | 9/19/03 | | | ($1,200.00) | | | |
| | the treasurer | | | | | | | |
| | by 2 bank drafts | | | | | | | |
| | Cash in hand | 9/19/03 | | | $0.00 | | | |
| | Grand Total Balance in the Trust Fund | | | $26,342.15 | Total Interest 2/14/02 to 9/30/03 | | | $1,753.03 |

Signed- S.D. Gokhale

(...contd. from prev. page)

खटपट करून ठरलेल्या तारखेसाठी एक चांगला हॉल मिळवून दिला. नाटकाची जाहिरात पत्रके छापून मंडळाच्या दिवाळी समारंभात सर्वांना वाटण्याचे ठरवले गेले.

नाटकातले कलाकार आपल्याला जमेल तसे पाठांतर करू लागले. डॉ. जगदीश मुडे दवाखान्यातच आपले संवाद म्हणून रुग्णांना घाबरवू लागले. नाटकातील रडण्याची तालीम अंजली जोशी जातील तिकडे भोकांड पसरून करू लागल्या. श्रीकांत–गीता लिमये भांडणाचा प्रवेश पाठ करून रोज आपल्या घरी म्हणू लागल्यानंतर "लिमये दररोज भांडतात!" अशी कुणकुण मंडळात सुरू झाली. दंतवैद्य अशोक देशपांडे दात पोखरण्याच्या यंत्रांच्या आवाजात लपेल अशा सुरात आपले संवाद पाठ करू लागले. तर अश्विनी दर्यापूरकर गाडी चालवताना, फोनवर बोलल्याच्या थाटात आपले संवाद म्हणू लागल्या. कोण्या एका मानसोपचारतज्ज्ञाने कलाकारांना स्वतःशीच बडबडताना पाहून "मला भेटा." हा सल्ला दिल्याचे वार्ताहरांना कळले. त्यांचे आमंत्रण स्वीकारून वार्ताहर स्वतः त्यांना भेटून आल्याचे नंतर कळले. या भेटीचा अहवाल गोपनीय असल्यामुळे प्रसिद्ध करता येणार नाही. परंतु तो अल्पदरात उपलब्ध आहे असे कळले.

नाटकाच्या तालमी कलाकारांनी आलटून पालटून आपापल्या घरी ठरवल्या. जुलै ते नोव्हेंबर हे चार महिने नाटकाच्या तालमीत कसे गेले ते कुणाला समजलेही नाही. सर्व कलाकार आपापल्या भूमिका वठवण्यात गुंग होते. तसे पाहिले तर २५ कलाकारांना एका जागी, एकाच वेळी जमवायचे हेच एक मोठे नाटक झाले होते. कलाकारांअभावी कधी शेवटचा प्रसंग प्रारंभी तर कधी एकच प्रसंग तीनदा अशी तडजोड करावी लागत असे. पाहता पाहता दोन अंकी नाटक उभे राहिले. नाटकातील गाण्यांसाठी गावकर दांपत्याची पेटी–तबल्याची सुरेख साथ मिळाली. ऐन वेळी पडद्यामागे व स्टेजवर अच्युत मालूरांची मोलाची मदत मिळाली. स्टेजवरच्या सामानाची व्यवस्था अशोक व संध्या देशपांडेंनी सांभाळली. प्रत्येकाने या ना त्या रीतीने नाटकास हातभार लावला.

नोव्हेंबर १५ रोजी या नाटकाचा प्रयोग यशस्वीरीत्या सादर झाला आणि प्रेक्षकांनीही उत्तम प्रतिसाद दिला. आलेल्या सर्व प्रेक्षकांनी हा प्रयोग गोड मानून कलाकारांचा आनंद द्विगुणित केला त्याबद्दल कलाकार व मंडळ आपल्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानत आहेत.

असाच लोभ असावा ही विनंती.

– मिलिंद कंटक

---

## *North East Ohio Marathi Mandal 2003 - Financial Results*

| Income | | |
|---|---|---|
| Opening Balance As of January 1, 2003 | $ | 3,869.36 |
| Membership collected at Diwali 2002 (32 members) | $ | 1,080.00 |
| Membership 2003 Balance Collected (13 members) | $ | 425.00 |
| Fast pass access collection (27 members) | $ | 665.00 |
| Life Membership collected (2 life member) | $ | 650.00 |
| Dues from trustees - Life members for 2002 | $ | 600.00 |
| Dues from trustees - Life members for 2003 | $ | 600.00 |
| Tickets sales during functions | $ | 1,809.05 |
| Advertisements for Jyoti | $ | 2,076.00 |
| Other income (Bank Interest/Donations) | $ | 310.00 |
| Membership collection for year 2004(25*$35+1*$15) | $ | 890.00 |
| **Total (Opening Balance + Total Income)** | **$** | **12,974.41** |
| **Expenses** | | |
| Life Member dues transferred to trustees | $ | 650.00 |
| Jyoti Publication Printing | $ | 985.28 |
| Rent to venues and events | $ | 335.00 |
| Event Expenses | $ | 2,003.50 |
| Website hosting Expenses | $ | 157.70 |
| Misc Expenses (any donations etc.) | $ | 201.00 |
| **Total Expenses** | **$** | **4,332.48** |
| **(Op. Bal + Income - Expenses) Balance forward** | **$** | **8,641.93** |

**Future Investments**

| | | |
|---|---|---|
| **Amount Transferred to Trustees for Future Investment** | **$** | **2,500.00** |
| **Closing Balance for the year 2003** | **$** | **6,141.93** |

**Outstanding issues**

| | | |
|---|---|---|
| Bank Balance as of 1/13/2004 | $ | 8,641.93 |
| Outstanding chq to Trustees | $ | 2,500.00 |
| Outstanding - Natak Hall deposit chq. | $ | 100.00 |
| Outstanding - Natak hall deposit refund to come | $ | 100.00 |
| **Closing balance** | **$** | **6,141.93** |

Signed by

Chetan Amin
President NEOMM 2003

Samir Deshpande
Treasurer NEOMM 2003

---

If undelivered, please return to:
Anjali Joshi
6507 Marsol Road Apt. 547
Mayfield Heights, OH 44124-3586

Stamp

**TO**